आस्थापना विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## (गोषवारा) दि. ०१/११/२०२३

२४८

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागात नागरी आरोग्य केंद्रामध्ये ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी / औषध निर्माण अधिकारी व प्रसविका यांना 06 महिन्यांसाठी मुदतवाढ देणेबाबत

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील नागरी आरोग्य केंद्रातील ठोक मानधनावर कार्यरत वैद्यकीय अधिकारी, औषध निर्माण अधिकारी व प्रसविका कार्यरत आहेत. सदर कर्मचाऱ्यांची मुदत दि.12/08/2023 व दि.19/08/2023 रोजी संपुष्टात आलेली आहे. सदर कर्मचाऱ्यांची सार्वजनिक वैद्यकीय विभागास आवश्यकता असून सदर कर्मचाऱ्यांची मुदतवाढ देणेबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने पत्रान्वये कळविले आहे. तसेच सार्व. आरोग्य (वैद्यकीय) विभागातील मनपा हद्दीतील लोकांच्या आरोग्याची गरज व निकड लक्षात घेता वैद्यकीय अधिकारी (ठोक मानधन) या पदासाठी मासिक ठोक मानधन रु.80,000/- इतके करणेकरीता मा. आयुक्त महोदय यांनी दि.07/12/2022 रोजी मंजूरी दिलेली आहे.

त्यानुसार तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांचे खालीलप्रमाणे नियुक्तीचे नविकरण करणेत येत आहे.

| अ. क्र. | नाव | पदनाम | वेतन | मुदत संपुष्टात येणारी दिनांक | खंड दिनांक | नव्याने नियुक्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | डॉ. सिध्दांत दौंदे | वैद्यकीय अधिकारी | 80,000/- | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 2. | डॉ. रमेश मौर्या | वैद्यकीय अधिकारी | 80,000/- | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 3. | डॉ. नितीन चक्रवर्ती | वैद्यकीय अधिकारी | 80,000/- | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 4. | श्रीम. जयश्री कोटे | प्रसविका | 20,000/- | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 5. | श्री. अक्षदा शिरसाट | प्रसविका | 20,000/- | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 6. | श्रीम. आम्रपाली बंडे | प्रसविका | 20,000/- | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 7. | श्रीम. हर्षदा भोईर | प्रसविका | 20,000/- | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 8. | श्रीम. आरोही पाटील | प्रसविका | 20,000/- | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 9. | श्री. स्वप्नाली चोरडेकर | प्रसविका | 20,000/- | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 10. | श्रीम. प्रितम मळेवाडकर | प्रसविका | 20,000/- | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |

| अ. क्र. | नाव | पदनाम | वेतन | मुदत संपुष्टात येणारी दिनांक | खंड दिनांक | नव्याने नियुक्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 11. | श्रीम. किरण पंडितकर | प्रसविका | 20,000/- | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 12. | श्रीम. व्टिंकल पाटील | औषध निर्माण अधिकारी | 20,000/- | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 13. | श्रीम. पालवी म्हात्रे | औषध निर्माण अधिकारी | 20,000/- | दि.19/08/2023 | दि.21/08/2023 | दि.22/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 14. | श्रीम. शिवरुद्र मठपती | औषध निर्माण अधिकारी | 20,000/- | दि.19/08/2023 | दि.21/08/2023 | दि.22/08/2023 ते दि.16/02/2024 |

वरील ठोक मानधनावरील कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याचे संबंधित विभागप्रमुख यांनी कळविल्यानुसार सदर कर्मचाऱ्यांचे नियुक्तीचे नविकरण करणेबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने कळविले आहे. सदर प्रस्तावास मा. प्रशासकीय सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. उपरोक्त तक्त्यामधील अ.क्र.01 ते 12 या कर्मचाऱ्यांची पदे आकृतीबंधानुसार भरण्यात आलेली आहे. परंतु अ.क्र.13 व अ.क्र.14 वरील औषध निर्माण अधिकारी ही पदे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आवश्यकतेनुसार अतिरिक्त स्वरुपात भरण्यात आलेली असून सार्वजनिक आरोग्य विभागाने सदर कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणेबाबत कळविले आहे. त्यानुसार अ.क्र.01 ते अ.क्र.14 मधील ठोक मानधनावरील कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचे नविकरण करणे उचित होईल.

सबब उपरोक्त तक्त्यात नमुद तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांमधील अनु.क्र.01 ते 12 कर्मचाऱ्यांची मुदत दि.12/08/2023 रोजी संपुष्टात येत असल्याने व दि.13/08/2023 रोजी (रविवार) सार्वजनिक सुट्टी असल्याने दि.14/08/2023 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.15/08/2023 व दि.16/08/2023 रोजी सुट्टी असल्याने दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 पर्यंत व अनु.क्र.13 ते 14 कर्मचाऱ्यांची मुदत दि.19/08/2023 रोजी संपुष्टात येत असल्याने व दि.20/08/2023 रोजी सुट्टी असल्याने दि.21/08/2023 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.22/08/2023 ते दि.16/02/2024 पर्यंत 06 महिन्यांसाठी नियुक्तीचे नविकरण करुन आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतच्या गोषवाऱ्यास मा. प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा/स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. 3 / 99 / 23 वेळ सायं. ६.००
रजिस्टर नोंद अ. क्र. २४६ सन २२/२३
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

## प्रशासकीय ठराव क्र. २५८ प्रशासकीय सभा दि. ६/ ११ /2023

प्रकरण क्र. :- २४८ मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागात नागरी आरोग्य केंद्रामध्ये ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी / औषध निर्माण अधिकारी व प्रसविका यांना 06 महिन्यांसाठी मुदतवाढ देणेबाबत

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील नागरी आरोग्य केंद्रातील ठोक मानधनावर कार्यरत वैद्यकीय अधिकारी, औषध निर्माण अधिकारी व प्रसविका कार्यरत आहेत. सदर कर्मचाऱ्यांची मुदत दि.12/08/2023 व दि.19/08/2023 रोजी संपुष्टात आलेली आहे. सदर कर्मचाऱ्यांची सार्वजनिक वैद्यकीय विभागास आवश्यकता असून सदर कर्मचाऱ्यांची मुदतवाढ देणेबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने पत्रान्वये कळविले आहे. तसेच सार्व. आरोग्य (वैद्यकीय) विभागातील मनपा हद्दीतील लोकांच्या आरोग्याची गरज व निकड लक्षात घेता वैद्यकीय अधिकारी (ठोक मानधन) या पदासाठी मासिक ठोक मानधन रु.80,000/- इतके करणेकरीता मा. आयुक्त महोदय यांनी दि.07/12/2022 रोजी मंजूरी दिलेली आहे.

त्यानुसार तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांचे खालीलप्रमाणे नियुक्तीचे नविकरण करणेत येत आहे.

| अ क्र | नाव | पदनाम | मुदत संपुष्टात येणारी दिनांक | खंड दिनांक | नव्याने नियुक्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1. | डॉ. सिध्दांत दोंदे | वैद्यकीय अधिकारी | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 2. | डॉ. रमेश मौर्या | वैद्यकीय अधिकारी | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 3. | डॉ. नितीन चक्रवर्ती | वैद्यकीय अधिकारी | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 4. | श्रीम. जयश्री कोटे | प्रसविका | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 5. | श्री. अक्षदा शिरसाट | प्रसविका | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 6. | श्रीम. आम्रपाली बंडे | प्रसविका | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 7. | श्रीम. हर्षदा भोईर | प्रसविका | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 8. | श्रीम. आरोही पाटील | प्रसविका | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 9. | श्री. स्वप्नाली चोरडेकर | प्रसविका | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 10. | श्रीम. प्रितम मळेवाडकर | प्रसविका | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |

| अ क्र | नाव | पदनाम | मुदत संपुष्टात येणारी दिनांक | खंड दिनांक | नव्याने नियुक्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 11. | श्रीम. किरण पंडितकर | प्रसविका | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 12. | श्रीम. व्टिंकल पाटील | औषध निर्माण अधिकारी | दि.12/08/2023 | दि.14/08/2023 | दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 13. | श्रीम. पालवी म्हात्रे | औषध निर्माण अधिकारी | दि.19/08/2023 | दि.21/08/2023 | दि.22/08/2023 ते दि.16/02/2024 |
| 14. | श्रीम. शिवरुद्र मठपती | औषध निर्माण अधिकारी | दि.19/08/2023 | दि.21/08/2023 | दि.22/08/2023 ते दि.16/02/2024 |

सबब उपरोक्त तक्त्यात नमुद तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांमधील अनु.क्र.01 ते 12 कर्मचाऱ्यांची मुदत दि.12/08/2023 रोजी संपुष्टात येत असल्याने व दि.13/08/2023 रोजी (रविवार) सार्वजनिक सुट्टी असल्याने दि.14/08/2023 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.15/08/2023 व दि.16/08/2023 रोजी सुट्टी असल्याने दि.17/08/2023 ते दि.16/02/2024 पर्यंत व अनु.क्र.13 ते 14 कर्मचाऱ्यांची मुदत दि.19/08/2023 रोजी संपुष्टात येत असल्याने व दि.20/08/2023 रोजी सुट्टी असल्याने दि.21/08/2023 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.22/08/2023 ते दि.16/02/2024 पर्यंत 06 महिन्यांसाठी नियुक्तीचे नविकरण करुन त्यांच्या वेतनावर होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

## // गोषवारा //

**प्रकरण क्र** ( २४८ ) :- दि. ६/११/२०२३ मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेतील मलनि:सारण केंद्र-1 साठी लागणारी मीठ विभागाची जागा महानगरपालिकेकडे हस्तांतर करण्यासाठी सॉल्ट विभागास "बंधपत्र" देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेअंतर्गत भाईंदर पश्चिम भागातील सांडपाण्यावर प्रक्रीया करण्यासाठी मल:निसारण केंद्र-1 मौजे भाईंदर सर्व्हे क्र.722 (जुना) सर्व्हे क्र.342 पै. नविन या जागेत असून सदर जागेपैकी 4385 चौ. मीटर मीटर जागा राज्य शासनाने महानगरपालिकाकडे हस्तांतरीत केलेली असून त्यामध्ये मलनि:सारण केंद्र चे काम सुरु करण्यात आले. तथापी सदर काम सुरु करण्यात आलेल्या जागेशेजारी मीठ विभागाची जागा असल्याने त्यांनी हरकत घेतल्याने काम बंद करण्यात आले. सदर जागेची भूमी अभिलेख कार्यालयामार्फत मोजणी करण्यात आली असता सुरु असलेल्या कामातील काही जागा मीठ विभागाची असल्याचे निदर्शनास आले.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नविन विकास योजनेत उपरोक्त सर्व्हे क्र.764 व सर्व्हे क्र.722 या जागेवर STP चे आरक्षण दर्शविलेले आहे. त्यामुळे सर्व्हे क्र.764 (जुना) सर्व्हे क्र.378 (नविन) या मिठ विभागाकडील जागेपैकी आरक्षणाखालील 6547.00 चौ. मी. जागा मिरा भाईंदर महानगरपालिकाकडे हस्तांतरण होणे आवश्यक आहे. जेणेकरुन मलनि:सारण केंद्र-1 चे काम सुरळीत सुरु होईल व मलनि:सारणकेंद्रा करीता पोहोच रस्ता उपलब्ध होईल. तरी सदर जागा हस्तांतरणासाठी मीठ विभागामार्फत केंद्र शासनाच्या सॉल्ट कमिशनर, जयपुर यांच्याकडे प्रस्ताव पाठविणेस मा. आयुक्त सो यांनी मंजुरी दिलेली आहे.

मौजे भाईंदर सर्व्हे क्र.764 (जुना) सर्व्हे क्र.378 (नविन) या जागेची रेडीरेकनरनुसार रु.8.38 कोटी इतकी किंमत होत आहे. उपरोक्त प्रस्तावात नमुद सॉल्ट विभागाच्या ताब्यातील आरक्षणाने बाधित जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यासाठी चालु बाजार भावानुसार महानगरपालिका मोबदला देण्यास तयार असलेबाबत "बंधपत्र" राज्य शासनाकडे देणे आवश्यक आहे.

तरी सॉल्ट विभागाची जागा ताब्यात घेण्यासाठी "बंधपत्र" देण्यास मान्यता मिळणेस शिफारस आहे.

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

**प्रशासकीय ठराव दिनांक ९/१७/२०२३**

विषय क्र. ( २४९ ) :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेतील मलनि:सारण केंद्र-1 साठी लागणारी मीठ विभागाची जागा महानगरपालिकेकडे हस्तांतर करण्यासाठी सॉल्ट विभागास "बंधपत्र" देणेस मान्यता मिळणेबाबत.

ठराव क्र. ( २४९ )

**कार्यलयीन प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेअंतर्गत भाईंदर पश्चिम भागातील सांडपाण्यावर प्रक्रीया करण्यासाठी मल:निसारण केंद्र-1 मौजे भाईंदर सर्व्हे क्र.722 (जुना) सर्व्हे क्र.342 पै. नविन या जागेत असून सदर जागेपैकी 4385 चौ. मीटर मीटर जागा राज्य शासनाने महानगरपालिकाकडे हस्तांतरीत केलेली असून त्यामध्ये मलनि:सारण केंद्र चे काम सुरु करण्यात आले. तथापी सदर काम सुरु करण्यात आलेल्या जागेशेजारी मीठ विभागाची जागा असल्याने त्यांनी हरकत घेतल्याने काम बंद करण्यात आले. सदर जागेची भूमी अभिलेख कार्यालयामार्फत मोजणी करण्यात आली असता सुरु असलेल्या कामातील काही जागा मीठ विभागाची असल्याचे निदर्शनास आले.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नविन विकास योजनेत उपरोक्त सर्व्हे क्र.764 व सर्व्हे क्र.722 या जागेवर STP चे आरक्षण दर्शविलेले आहे. त्यामुळे सर्व्हे क्र.764 (जुना) सर्व्हे क्र.378 (नविन) या मिठ विभागाकडील जागेपैकी आरक्षणाखालील 6547.00 चौ. मीं. जागा मिरा भाईंदर महानगरपालिकाकडे हस्तांतरण होणे आवश्यक आहे. जेणेकरुन मलनि:सारण केंद्र-1 चे काम सुरळीत सुरु होईल व मलनि:सारणकेंद्रा करीता पोहोच रस्ता उपलब्ध होईल. तरी सदर जागा हस्तांतरणासाठी मीठ विभागामार्फत केंद्र शासनाच्या सॉल्ट कमिशनर, जयपुर यांच्याकडे प्रस्ताव पाठविणेस मा. आयुक्त सो यांनी मंजुरी दिलेली आहे.

मौजे भाईंदर सर्व्हे क्र.764 (जुना) सर्व्हे क्र.378 (नविन) या जागेची रेडीरेकनरनुसार रु.8.38 कोटी इतकी किंमत होत आहे. उपरोक्त प्रस्तावात नमुद सॉल्ट विभागाच्या ताब्यातील आरक्षणाने बाधित जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यासाठी चालु बाजार भावानुसार महानगरपालिका मोबदला देण्यास तयार असलेबाबत "बंधपत्र" राज्य शासनाकडे देणे आवश्यक आहे.

सॉल्ट विभागाची जागा ताब्यात घेण्यासाठी "बंधपत्र" देण्यास प्रशासकिय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. २४९ दिनांक ६/११/२०२३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी वे विशेषत: कलम 452(अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, संजय श्रीपतराव काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेतील मलनि:सारण केंद्र-1 साठी लागणारी सॉल्ट विभागाच्या ताब्यातील आरक्षणाने बाधित जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेसाठी चालू बाजार भावानुसार रु.8.38 कोटी इतका मोबदला देण्यास तयार असलेबाबतचे "बंधपत्र" सॉल्ट विभागास देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(संजय श्रीपतराव काटकर)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत: पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // बांधकाम विभाग //

## // गोषवारा //

दि. ६/११/२०२३

**प्रकरण क्रमांक.** (२५०) - मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.230 मेडीटेशन सेंटर मध्ये ध्वनी प्रतिबंधक उपाययोजना करणे..

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.230 या ठिकाणी मेडीटेशन सेंटर करीता हॉल तयार करण्यात आला आहे. सदर हॉल मध्ये मेडीटेशनसाठी सतत नागरीक येत असतात त्याकरीता सदर हॉलकरीता ध्वनी प्रतिबंधक उपाययोजना करणे गरजेचे आहे. सदरील कामाचे खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1. | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.230 मेडीटेशन सेंटर मध्ये ध्वनी प्रतिबंधक उपाययोजना करणे. | रु.31,98,650/- |

वरील कामाच्या आर्थिक व प्रशासकीय मंजूरीस प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यास शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-05/DK/23-24/MG-6

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव २५० दिनांक :- ६/११/२०२३

**प्रकरण क्रमांक :-** (२५०) मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.230 मेडीटेशन सेंटर मध्ये ध्वनी प्रतिबंधक उपाययोजना करणे या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.230 या ठिकाणी मेडीटेशन सेंटर करीता हॉल तयार करण्यात आला आहे. सदर हॉल मध्ये मेडीटेशनसाठी सतत नागरीक येत असतात त्याकरीता सदर हॉलकरीता ध्वनी प्रतिबंधक उपाययोजना करणे गरजेचे आहे. सदरील कामाचे खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1. | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.230 मेडीटेशन सेंटर मध्ये ध्वनी प्रतिबंधक उपाययोजना करणे. | रु.31,98,650/- |

मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.230 मेडीटेशन सेंटर मध्ये ध्वनी प्रतिबंधक उपाययोजना करणे या कामास प्रशासकिय ठरावाद्वारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

## प्रशासकीय ठराव क्र.२५० दिनांक ६/११/2023

वरील प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, श्री. संजय काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.230 मेडीटेशन सेंटर मध्ये ध्वनी प्रतिबंधक उपाययोजना करणे (अंदाजित खर्च रु.31,98,650/-) या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरीस प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(संजय काटकर, भाप्रसे)**
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य विभाग

## // गोषवारा //

दि. ०६/११/२०२३

प्रकरण क्र.:- २५१

**विषय :- १५ व्या वित्त आयोगांतर्गत नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र/ आपला दवाखाना करीता वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी भरती करणेबाबत...**

केंद्र शासनाकडून १५ व्या वित्त आयोगांतर्गत आरोग्य विषयक योजनांसाठी तसेच प्राथमिक आरोग्य संस्थाना सक्षम व बळकट करण्यासाठी सन २०२१-२२ ते २०२५-२६ या पाच वर्षांच्या कालावधीत विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सन २०२१-२२ या कालावधीत ११ व सन २०२२-२३ करीता २४ असे एकूण ३५ नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रे (Urban Health and Wellness Center) मंजूर करण्यात आली असून सदर नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रे उभारणी करणे तसेच आवश्यक मनुष्यबळ नेमूण त्यांच्या मानधनकरीताचा निधी शासनामार्फत उपलबध करून देण्यात येणार आहे.

त्यान्वये महानगरपालिकेने स्वमालकीच्या १० जागा उपलब्ध करून दिल्या असून सदर ठिकाणी शासन मार्गदर्शक सुचनान्वये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दुरुस्ती व नुतनीकरण करण्यात आले आहे. यापैकी ५ नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. तथापि शासनामार्फत नेमलेल्या ८ पैकी ७ वैद्यकीय अधिकारी काम सोडून गेले आहेत, त्यामुळे कार्यान्वित केलेल्या ५ नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रामध्ये कार्यरत परिचारिका यांचेमार्फत दैनंदिन कामकाज सुरु आहे. उर्वरित पाच नागरी आरोग्य वर्धिनी केंद्राचे बांधकाम पूर्ण झाले असून मनुष्यबळ उपलब्ध होताच कार्यान्वित करण्यात येतील.

कार्यान्वित नागरी आरोग्य वर्धिनी केंद्राचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ. क्र. | नागरी आरोग्य वर्धिनी केंद्राचे नाव | कार्यरत अधिकारी/कर्मचारी |
|---|---|---|
| १ | इंद्रलोक | वैद्यकीय अधिकारी व परिचारिका |
| २ | पाली, उत्तन | परिचारिका |
| ३ | मोर्वागाव | परिचारिका |
| ४ | काजूपाडा | परिचारिका |
| ५ | शांतीनगर | परिचारिका |

प्रति नागरी आरोग्यवर्धिनी केंद्राकरीता आवश्यक मनुष्यबळ व मंजूर मनुष्यबळ तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | प्रति नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र मनुष्यबळ | मंजुर पदे | उपलब्ध करुन देण्यात आलेले मनुष्यबळ | सद्यस्थित कार्यरत मनुष्यबळ |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीयअधिकारी(MBBS)- १ | ३५ | ८ | १ |
| २ | परिचारिका (GNM)-१ | ३५ | ६ | ६ |
| ३ | MPW (Male)— १ | ३५ | ० | ० |
| ४ | Attendant/ Guard - १ | ३५ | बाह्यस्त्रोत पद्धतीने भरण्यात येणार आहेत. | |
| ५ | Cleaning Staff -१ | ३५ | बाह्यस्त्रोत पद्धतीने भरण्यात येणार आहेत. | |

मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र, मुंबई यांचे जा.क्र.राआसो/माव्यक/१५thFin/खरेदी प्रक्रिया/१०६७५४-१०७४६२/२०२२ दि.०२/०८/२०२२ रोजीच्या पत्रांन्वये १५व्या वित्त आयोग अंतर्गत महानगरपालिके स्तरावर मंजूर असलेल्या नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रांकरीता आवश्यक असणारे मंजुर मनुष्यबळाची पदभरती करणेकरीता जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन पदभरती प्रक्रिया राबवून उपरोक्त तक्त्यात नमूदप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले होते. सद्यस्थितीत इंद्रलोक UHWC येथे १ वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून उर्वरित ७ वैद्यकीय अधिकारी काम सोडून गेले आहेत.

नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रांकरीता आवश्यक मनुष्यबळाची पदभरती प्रक्रिया जिल्हा स्तरावरुन विहित मुदतीत पुर्ण होत नसल्याने नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रे कार्यान्वित करण्यास अडचण होत असल्याने मा. सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे कार्यालयाकडील जा.क्र.राकाव्य/१५वा वित्त आयोग/मनु.पदभरती/३३३५-३६६७/ २०२३ दि.१७.०४.२०२३ रोजीच्या पत्रांन्वये पदभरतीची जबाबदारी/अधिकार महानगरपालिके स्तरावर प्रदान करण्यात आले असून मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र, मुंबई यांचे जा.क्र.राआसो/मनुष्यबळ कक्ष/पदभरती समिती/१६५४५०-७४६/२०२२ दि.२४/११/२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये गठित समितीमार्फत पदभरती प्रक्रिया राबविण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. त्यान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रांतील रिक्त पदे भरणे आवश्यक आहे.

नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रांकरीता मंजुर पदांचा मानधन तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | मनुष्यबळ | प्रति महा मानधन (रु.) |
|---|---|---|
| १ | वैद्यकीयअधिकारी(MBBS) | ६०,०००/- |
| २ | परिचारिका (GNM) | २०,०००/- |
| ३ | MPW (पुरुष) | १८,०००/- |

उपरोक्त पदांपैकी वैद्यकीय अधिकारी हे पद बहुतांश वेळा उमेदवार उपलब्ध न झाल्याने/ नियुक्त झालेले वैद्यकीय अधिकारी हे पुढील शिक्षणाकरीता सोडून जातात तसेच मिरा भाईंदर शहर हे मुंबई शहराच्या नजीकचे असल्याने इतर ठिकाणी मिळत असलेले अधिक मानधन या काराणांमुळे सोडून जातात त्यामुळे प्रभावीपणे आरोग्य विषयक सेवा/कार्यक्रम यांची अंमलबजावणी करण्यात अडथळा निर्माण होतो.

यापूर्वी महानगरपालिकेने राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवर इंदिरा गांधी रुग्णालयाकरीता अस्थायी स्वरुपातील वैद्यकीय अधिकारी या पदांची भरती करणेकामी वारंवार जाहिरात प्रसिध्द करूनही अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे निदर्शनास आले होते. प्रतिसाद न मिळण्याचे महत्वाचे कारण सदर पदासाठी देऊ केलेले वेतन कमी आहे. त्याकामी अनुक्रमे रु.६०,०००/- व रु.७०,०००/- इतके मानधनवाढ देऊनही पदे रिक्त राहत असल्याने मा. आयुक्त यांचे दि. २०/०७/२०२३ रोजीचे मान्यतेने सदर पदाकरीता रु.८०,०००/- इतके मासिक मानधन देण्यास मंजूरी घेऊन त्याअनुषंगाने जाहिरात प्रसिद्ध करून रिक्त पदांची भरती करण्यात आली आहे.

मा. सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे कार्यालयाकडील जा.क्र.राआसो/अपला दवाखाना/८६५९८-८७७/२०२३ दि.१९.१०.२०२३ रोजीच्या पत्रांन्वये मिरा भाईंदर महानगरापालिका कार्यक्षेत्रात ११ "हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" तात्काळ सुरू करणेबाबत कळविण्यात आले आहे.

त्याकरीता वैद्यकीय अधिकारी ही रिक्त पदे भरणे अत्यावश्यक आहे. या पदाकरीता शासनामार्फत प्रतिमहा रु. ६०,०००/- इतके मानधन मंजुर करण्यात आले आहे. परंतु यापूर्वीची वस्तुस्थिती लक्षात घेता वैद्यकीय अधिकारी या पदा करीता प्रतिमहा रु.८०,०००/- इतके मानधन मंजुर करुन जाहिरात प्रसिद्ध केल्यास रिक्त पदांची पदभरती करणे शक्य होईल. या करीताचा खर्च शासनाकडील मानधन रु.६०,०००/- व मनपाकडील रु.२०,०००/- अश्या प्रकारे अदा करणे उचित ठरेल. याकामी महानगरपालिका निधीतून प्रतिमहा ३५ पदांकरीता प्रति वैद्यकीय अधिकारी रु. २०,०००/- याप्रामणे एकूण ७,००,०००/- इतका मासिक खर्च अपेक्षित आहे.

शासन सुचनान्वये सदरची पदभरती ही बिंदूनामावली प्रमाणे करणे बंधनकारक आहे. परंत शासन सुचनांन्वये "हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" तात्काळ सुरु करण्याबाबत सुचनाप्राप्त झाल्या आहेत. त्यान्वये बिंदूनामावली रजिस्टर तयार करुन उपसंचालक, ठाणे यांचे कार्यालयात प्रमाणित करणेकामी सादर करण्यात आले आहे. तरी याकामी विलंब होण्याची शक्यता व आपला दवाखाना तात्काळ सुरु करणेबाबत प्राप्त सुचना लक्षात घेता बिंदूनामावलीच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात रिक्त पदांची भरती केल्यास आपला दवाखाना लवकरात लवकर सुरु करणे शक्य होईल.

तरी अशाप्रकारे शासनाने मंजूर केलेल्या ३५ नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रे व ११ आपला दवाखानापैकी पहिल्या टप्प्यात १० नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रे व ०५ आपला दवाखाना सुरु करणेकामी एकूण १५ वैद्यकीय अधिकारी यांची नेमणूक करणेस व सदर पदास शासनामार्फत प्रतिमहा मंजुर मानधन रु.६०,०००/- व महानगरपालिका निधीतून प्रतिमाह रु. २०,०००/- वाढीव मानधन असे एकत्रित रु. ८०,०००/- अदा करणेस मा.आयुक्त महोदयांची दि. २७/१०/२०२३ रोजीची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यान्वये प्रति वैद्यकीय अधिकारी प्रतिमाह रु.२०,०००/- याप्रमाणे १५ वैद्यकीय अधिकारी यांच्या वाढीव मानधनाकरीता रु. ३६.०० लाख इतका वार्षिक खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च "अस्थायी आस्थापना/सुरक्षा रक्षक" या लेखाशिर्षा अंतर्गत भागविता येईल. तसेच भविष्यात उर्वरित नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रे व आपला दवाखानाकरीता वैद्यकीय अधिकारी यांची नेमणूक करताना देखील महानगरपालिकेमार्फत सदरचे वाढीव मानधन अदा करणे आवश्यक आहे.

सबब सदर १५ नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रे/आपला दवाखाना तात्काळ सुरु करण्यासाठी १५ वैद्यकीय अधिकारी पदांची भरती प्रक्रिया शासन सुचनान्वये राबविणे, पात्र उमेदवारांना नेमणूक आदेश देणे, त्याचप्रमाणे निवड झालेल्या वैद्यकीय अधिकारी यांना महानगरपालिकेमार्फत प्रतिमाह वाढीव मानधन रु.२०,०००/- अदा करणे व याकामी येणाऱ्या वार्षिक रक्कम रु.३६.०० लाख खर्चास तसेच भविष्यात उर्वरित नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रे व आपला दवाखानाकरीता वैद्यकीय अधिकारी यांची नेमणूक करताना देखील महानगरपालिकेमार्फत सदरचे वाढीव मानधन अदा करणेस मा. प्रशासक यांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने उपरोक्तप्रमाणे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास मा. प्रशासक यांची मान्यता मिळावी ही विनंती.

(संजय शिंदे)
उपायुक्त (सार्व. आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकीय सभा दि. ६/१२/२०२३

**प्रकरण क्र.२५७ : मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज.**

**ठराव क्र.२५१ : १५ व्या वित्त आयोगांतर्गत नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र/आपला दवाखाना करीता वैद्यकीय अधिकारी कर्मचारी यांची नेमणूक करणेबाबत...**

केंद्र शासनाकडून १५ व्या वित्त आयोगांतर्गत आरोग्य विषयक योजनांसाठी तसेच प्राथमिक आरोग्य संस्थाना सक्षम व बळकट करण्यासाठी सन २०२१-२२ ते २०२५-२६ या पाच वर्षांच्या कालावधीत विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सन २०२१-२२ या कालावधीत ११ व सन २०२२-२३ करीता २४ असे एकूण ३५ नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रे (Urban Health and Wellness Center) मंजूर करण्यात आली असून सदर नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रे उभारणी करणे तसेच आवश्यक मनुष्यबळ नेमूण त्यांच्या मानधनकरीताचा निधी शासनामार्फत उपलबध करून देण्यात येणार आहे.

त्यान्वये महानगरपालिकेने स्वमालकीच्या १० जागा उपलब्ध करून दिल्या असून सदर ठिकाणी शासन मार्गदर्शक सुचनान्वये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दुरुस्ती व नुतनीकरण करण्यात आले आहे. यापैकी ५ नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. तथापि शासनामार्फत नेमलेल्या ८ पैकी ७ वैद्यकीय अधिकारी काम सोडून गेले आहेत, त्यामुळे कार्यान्वित केलेल्या ५ नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रामध्ये कार्यरत परिचारिका यांचेमार्फत दैनंदिन कामकाज सुरु आहे. उर्वरित पाच नागरी आरोग्य वर्धिनी केंद्राचे बांधकाम पूर्ण झाले असून मनुष्यबळ उपलब्ध होताच कार्यान्वित करण्यात येतील. कार्यान्वित नागरी आरोग्य वर्धिनी केंद्राचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ. क्र. | नागरी आरोग्य वर्धिनी केंद्राचे नाव | कार्यरत अधिकारी/कर्मचारी |
|---|---|---|
| १ | इंद्रलोक | वैद्यकीय अधिकारी व परिचारिका |
| २ | पाली, उत्तन | परिचारिका |
| ३ | मोर्वागाव | परिचारिका |
| ४ | काजूपाडा | परिचारिका |
| ५ | शांतीनगर | परिचारिका |

प्रति नागरी आरोग्यवर्धिनी केंद्राकरीता आवश्यक मनुष्यबळ व मंजूर मनुष्यबळ तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | प्रति नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र मनुष्यबळ | मंजुर पदे | उपलब्ध करुन देण्यात आलेले मनुष्यबळ | सद्यस्थित कार्यरत मनुष्यबळ |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीयअधिकारी(MBBS)- १ | ३५ | ८ | १ |
| २ | परिचारिका (GNM)-१ | ३५ | ६ | ६ |
| ३ | MPW (Male)— १ | ३५ | ० | ० |
| ४ | Attendant/ Guard - १ | ३५ | बाह्यस्त्रोत पद्धतीने भरण्यात येणार आहेत. | |
| ५ | Cleaning Staff -१ | ३५ | बाह्यस्त्रोत पद्धतीने भरण्यात येणार आहेत. | |

मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र, मुंबई यांचे जा.क्र.राआसो/माव्यक/१५thFin/खरेदी प्रक्रिया/१०६७५४-१०७४६२/२०२२ दि.०२/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये १५व्या वित्त आयोग अंतर्गत महानगरपालिके स्तरावर मंजूर असलेल्या नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रांकरीता आवश्यक असणारे मंजुर मनुष्यबळाची पदभरती करणेकरीता जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन पदभरती प्रक्रिया राबवून उपरोक्त तक्त्यात नमूदप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करून

देण्यात आले होते. सद्यस्थितीत इंद्रलोक UHWC येथे १ वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून उर्वरित ७ वैद्यकीय अधिकारी काम सोडून गेले आहेत.

नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रांकरीता आवश्यक मनुष्यबळाची पदभरती प्रक्रिया जिल्हा स्तरावरुन विहित मुदतीत पुर्ण होत नसल्याने नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रे कार्यान्वित करण्यास अडचण होत असल्याने मा. सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे कार्यालयाकडील जा.क्र.राकाव्य/१५वा वित्त आयोग/मनु.पदभरती/३३३५-३६६७/२०२३ दि.१७.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये पदभरतीची जबाबदारी/अधिकार महानगरपालिके स्तरावर प्रदान करण्यात आले असून मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र, मुंबई यांचे जा.क्र.राआसो/मनुष्यबळ कक्ष/पदभरती समिती/१६५४५०-७४६/२०२२ दि.२४/११/२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये गठित समितीमार्फत पदभरती प्रक्रिया राबविण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. त्यान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रांतील रिक्त पदे भरणे आवश्यक आहे.

नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रांकरीता मंजुर पदांचा मानधन तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | मनुष्यबळ | प्रति महा मानधन (रु.) |
|---|---|---|
| १ | वैद्यकीयअधिकारी(MBBS) | ६०,०००/- |
| २ | परिचारिका (GNM) | २०,०००/- |
| ३ | MPW (पुरुष) | १८,०००/- |

उपरोक्त पदांपैकी वैद्यकीय अधिकारी हे पद बहुतांश वेळा उमेदवार उपलब्ध न झाल्याने/ नियुक्त झालेले वैद्यकीय अधिकारी हे पुढील शिक्षणाकरीता सोडून जातात तसेच मिरा भाईंदर शहर हे मुंबई शहराच्या नजीकचे असल्याने इतर ठिकाणी मिळत असलेले अधिक मानधन या कारणांमुळे सोडून जातात त्यामुळे प्रभावीपणे आरोग्य विषयक सेवा/कार्यक्रम यांची अंमलबजावणी करण्यात अडथळा निर्माण होतो.

यापूर्वी महानगरपालिकेने राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवर इंदिरा गांधी रुग्णालयाकरीता अस्थायी स्वरुपातील वैद्यकीय अधिकारी या पदांची भरती करणेकामी वारंवार जाहिरात प्रसिध्द करूनही अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे निदर्शनास आले होते. प्रतिसाद न मिळण्याचे महत्वाचे कारण सदर पदासाठी देऊ केलेले वेतन कमी आहे. त्याकामी अनुक्रमे रु.६०,०००/- व रु.७०,०००/- इतके मानधनवाढ देऊनही पदे रिक्त राहत असल्याने मा. आयुक्त यांचे दि. २०/०७/२०२३ रोजीचे मान्यतेने सदर पदाकरीता रु.८०,०००/- इतके मासिक मानधन देण्यास मंजूरी घेऊन त्याअनुषंगाने जाहिरात प्रसिद्ध करून रिक्त पदांची भरती करण्यात आली आहे.
मा. सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे कार्यालयाकडील जा.क्र.राआसो/अपला दवाखाना/८६५९८-८७७/२०२३ दि.१९.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मिरा भाईंदर महानगरापालिका कार्यक्षेत्रात ११ "हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" तात्काळ सुरू करणेबाबत कळविण्यात आले आहे.

त्याकरीता वैद्यकीय अधिकारी ही रिक्त पदे भरणे अत्यावश्यक आहे. या पदाकरीता शासनामार्फत प्रतिमहा रु. ६०,०००/- इतके मानधन मंजुर करण्यात आले आहे. परंतु यापूर्वीची वस्तुस्थिती लक्षात घेता वैद्यकीय अधिकारी या पदा करीता प्रतिमहा रु.८०,०००/- इतके मानधन मंजुर करुन जाहिरात प्रसिद्ध केल्यास रिक्त पदांची पदभरती करणे शक्य होईल. या करीताचा खर्च शासनाकडील मानधन रु.६०,०००/- व मनपाकडील रु.२०,०००/- अश्या प्रकारे अदा करणे उचित ठरेल. याकामी महानगरपालिका निधीतून प्रतिमहा ३५ पदांकरीता प्रति वैद्यकीय अधिकारी रु. २०,०००/- याप्रामणे एकूण ७,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

शासन सुचनान्वये सदरची पदभरती ही बिंदूनामावली प्रमाणे करणे बंधनकारक आहे. परंत शासन सुचनांन्वये "हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" तात्काळ सुरु करण्याबाबत सुचनाप्राप्त झाल्या आहेत. त्यान्वये बिंदूनामावली रजिस्टर तयार करुन उपसंचालक, ठाणे यांचे कार्यालयात प्रमाणित करणेकामी सादर करण्यात आले आहे. तरी याकामी विलंब होण्याची शक्यता व आपला दवाखाना तात्काळ सुरु करणेबाबत प्राप्त सुचना लक्षात घेता

बिंदूनामावलीच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात रिक्त पदांची भरती केल्यास आपला दवाखाना लवकरात लवकर सुरु करणे शक्य होईल.

तरी अशाप्रकारे शासनाने मंजूर केलेल्या ३५ नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रे व ११ आपला दवाखानापैकी पहिल्या टप्प्यात १० नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रे व ०५ आपला दवाखाना सुरु करणेकामी एकूण १५ वैद्यकीय अधिकारी यांची नेमणूक करणेस व सदर पदास शासनामार्फत प्रतिमहा मंजुर मानधन रु.६०,०००/- व महानगरपालिका निधीतून प्रतिमाह रु. २०,०००/- वाढीव मानधन असे एकत्रित रु. ८०,०००/- अदा करणेस मा.आयुक्त महोदयांची दि.२७/१०/२०२३ रोजीची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यान्वये प्रति वैद्यकीय अधिकारी प्रतिमाह रु.२०,०००/- याप्रमाणे १५ वैद्यकीय अधिकारी यांच्या वाढीव मानधनाकरीता रु. ३६.०० लाख इतका वार्षिक खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च "अस्थायी आस्थापना सुरक्षा रक्षक" या लेखाशिर्षा अंतर्गत भागविता येईल.

सबब सदर १५ नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रे/आपला दवाखाना तात्काळ सुरु करण्यासाठी १५ वैद्यकीय अधिकारी पदांची भरती प्रक्रिया शासन सुचनान्वये राबविणे, पात्र उमेदवारांना नेमणूक आदेश देणे, त्याचप्रमाणे निवड झालेल्या वैद्यकीय अधिकारी यांना महानगरपालिकेमार्फत प्रतिमाह वाढीव मानधन रु. २०,०००/- अदा करणे व याकामी येणाऱ्या वार्षिक रक्कम रु.३६.०० लाख खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

पारित ठरावानुसार पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पद्धतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका